महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

Email ID - So-confidential2@mpsc.gov.in Desk-16 Tel No. 69385987 / 986 / 985

क्रमांक : सीएमई-०४२४/सी.आर-१२/२०२४/१६ दिनांक : ऑक्टोबर, २०२४

स्पीड पोस्टाने/ गोपनीय/ कालमर्यादा

प्रति, श्री. काकासाहेब गंगाधर पोकळे

**विषय: - प्रश्नलेखक म्हणून नियुक्तीबाबत.**

आयोगाकडून मोठ्या प्रमाणात स्पर्धा परीक्षा, मर्यादित विभागीय परीक्षा तसेच चाळणी परीक्षांचे आयोजन केले जाते. मोठ्या प्रमाणात / बहुसंख्य प्रश्न तयार करण्याकरिता विविध शैक्षणिक क्षेत्रातील/ संस्थांमधील विद्यापीठांमधील विषय तज्ञांची आवश्यकता असते. वर्षभरात एकापाठोपाठ सलग परीक्षांचा ओघ राहत असल्याने आयोगाला सुद्धा बाह्यमाध्यमांद्वारे अशा विषय तज्ज्ञांची प्रश्न तयार करुन घेण्यासाठी नितांत आवश्यकता असते. आयोगाकडून नियुक्त करण्यात येणा-या तज्ज्ञांकडून ब-याच वेळा आयोगाकडून सोपविण्यात आलेले काम नाकारण्यात येतात. परिणामी आयोगाला संबंधित परीक्षा विहित कालमर्यादेत पार पाडणे अशक्यप्राय होते. परिणामी भरतीप्रक्रियेसही विलंब होतो. त्यामुळे यासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित केल्या जाणा-या परीक्षांच्या गोपनीय कामासाठी विषयतज्ज्ञांच्या सेवा उपलब्ध करुन देणेबाबत महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने क्रमांक मलोआ११२३/प्रक्र९८/आठ, दि. ०४ मे, २०२३ रोजीचे शासन परिपत्रक निर्गमित केले आहे. सदर शासन परिपत्रकानुसार सर्व अध्यापकीय संवर्गातील विषयतज्ज्ञांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सोपविण्यात आलेली गोपनीय व संवेदनशील कामे विहित कालमर्यादेत व दर्जात्मक स्वरुपात करुन देणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच विषयतज्ज्ञांच्या सेवा आयोगास उपलब्ध करुन देणे शैक्षणिक संस्था प्रमुखावर बंधनकारक करण्यात आले आहे, ही बाब व शासन परिपत्रक आपल्या विभाग प्रमुखांच्या निदर्शनास आणण्यात यावी. सुलभ संदर्भासाठी सदर शासन परिपत्रकाची प्रत आपल्या माहितीसाठी सोबत जोडली आहे.

२. महाराष्ट्र लोकसेवा आयोग या सांविधानिक संस्थेमार्फत विविध वर्ग - १, २ व ३ च्या पदांवर नियुक्तीकरीता स्पर्धा परीक्षा / मुलाखतीद्वारे उमेदवारांची निवड करुन शासनाकडे शिफारस केली जाते. स्पर्धा परीक्षेकरीता आयोग संबंधित विषयांच्या तज्ज्ञांकडून प्रश्नपत्रिका तयार करुन घेते. दिवसेंदिवस विद्यापीठाच्या / विविध CET च्या परीक्षेच्या कामामध्ये होणारे गैरप्रकार, मुख्यत: प्रश्नपत्रिका फुटणे इत्यादी लक्षात घेऊन आयोगाच्या प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी सचोटी (Integrity) व कळकळीने काम करणा-या (dedication), त्याचबरोबर संबंधित विषयांत विशेष ज्ञान व नैपुण्य (expertise) असलेल्या तज्ज्ञांना आयोगाच्या परीक्षक सूचीमध्ये समाविष्ट केले आहे. त्यापैकी, आयोगाने आपली प्रश्नलेखक म्हणून नियुक्ती केली असून ही नियुक्ती आपण स्वीकारावी, अशी विनंती मी आपणांस करीत आहे. त्यानुसार आपण वस्तुनिष्ठ स्वरुपाचे प्रश्न कृपया खाली दर्शविलेल्या माहितीनुसार काढावेत:-

| | |
|---|---|
| (अ) विषय :- राज्यशास्त्र | |
| (ब) दर्जा :- **पदवी** | (क) माध्यम :- **मराठी व इंग्रजी** |
| (ड) प्रश्नसंख्या :- 15+3 extra. | (इ) प्रश्नक्रमांक:- 51 ते 65 |

संबंधित अभ्यासक्रमाची प्रत (सहपत्र-१) या पत्रासोबत जोडली आहे. त्यातील घटकांच्या समोर नमूद केलेल्या प्रश्नांइतकेच वस्तुनिष्ठ प्रश्न आपण तयार करावेत. जेव्हा घटकासमोर प्रश्नसंख्या नमूद केलेली नसते तेव्हा सर्व घटकांवर समप्रमाणात प्रश्न काढणे अपेक्षित आहे असे समजावे. तसेच आयोगाच्या परीक्षांचे स्वरुप हे विद्यापीठीय परीक्षांसारखे नसून ते स्पर्धात्मक असल्यामुळे दिलेल्या घटकांच्या संदर्भातील अद्ययावत माहिती/ विचार, नवीन उपपत्ती (थेअरिज) व पध्दती, नवीन प्रवाह/ दृष्टीकोन (अप्रोच) आदी नवनवीन बाबींवर देखील कृपया काही प्रश्न काढावेत. आयोगाकडून घेतल्या जाणा-या परीक्षांमधून चांगल्या उमेदवारांची निवड व्हावी, या हेतुने प्रश्न तयार करावयाचे आहेत. प्रश्नपुस्तिकामधील प्रश्नांची काठीण्य पातळी **५०% प्रश्न ज्ञान व आकलनावर आधारित, ३०% प्रश्न उपयोजन व विश्लेषणावर आधारित आणि २०% प्रश्न हे नवनिर्मिती व मूल्यमापनावर आधारित** असावेत, असे आयोगाने निश्चित केले आहे. त्यास अनुसरून आपण तयार केलेल्या **प्रश्नांचे प्रमाण ५०:३०:२०** असे असणे अपेक्षित आहे. तसेच तयार केलेले प्रश्न सदर प्रमाणात असल्याबाबत सोबतचे सहपत्र क्रमांक ३ मधील प्रमाणपत्र क मध्ये प्रमाणित करण्यात यावे.

३. आपणांकडून पाठविले जाणारे प्रश्न कोणत्याही गाईड, मार्गदर्शनपर पुस्तक व स्टडी मटेरियल च्या ध्वनी फिती/फ्लॉपी व सीडी मधून कॉपी केलेले नसावेत. तसेच ते कोणत्याही आयोगाला किंवा संस्थेला यापूर्वी आपण पाठविलेले नसावेत.

" मा. न्यायालयाने एका याचिकेच्या अनुषंगाने परीक्षेचे प्रश्न तयार करतांना बाजारात उपलब्ध असलेली अनधिकृत पुस्तके व साहित्य वापरणे टाळण्याचे निर्देश दिले आहेत. यास्तव प्रश्न तयार करताना कृपया केवळ अधिकृत (Authentic) पुस्तके व साहित्य संदर्भ म्हणून वापरण्यात यावीत."

४...

**४. आयोगाकडून घेण्यात येणाऱ्या वस्तुनिष्ठ परीक्षांसाठी परिगणक (Calculator) वापरण्याची परवानगी नसल्याने गणितीय प्रश्न तयार करताना उमेदवारांना उत्तरे शोधण्यासाठी परिगणकाची आवश्यकता लागणार नाही, ही काळजी घेण्यात यावी.**

५. प्रत्येक प्रश्नाला फक्त चार पर्यायी उत्तरे असावीत. त्या चार पर्यायी उत्तरांपैकी फक्त एकच उत्तर अचूक ठेवावे. दिलेल्या अभ्यासक्रमातील प्रत्येक घटकाच्या उपघटकावर पुरेशा प्रमाणात प्रश्न काढावेत. प्रश्न चुकीचा, एकापेक्षा अधिक उत्तरे असणे, शुध्दलेखनाच्या चुका इत्यादी कारणांसाठी आयोगाला प्रश्न रद्द करावे लागू नयेत याची आपण पूर्ण दक्षता घ्यावी अशी विनंती आहे.

६. या पत्रासोबत सहपत्र - (२) म्हणून पाठविलेल्या हिरवे छापील प्रश्नपत्र (Item Sheet) मधील प्रत्येक पानावर मराठी व इंग्रजी प्रश्न व पर्याय लिहावा. अशा प्रकारे प्रत्येक पानावर एकच प्रश्न दोन्ही भाषेत लिहावा. प्रश्नपत्रावरील अचूक उत्तर लिहिण्याच्या जागी त्या प्रश्नाच्या अचूक उत्तराचा पर्याय क्रमांक अक्षरी व अंकी लिहावा. त्याचबरोबर अचूक उत्तराची आयोगाला पडताळणी करता यावी म्हणून आवश्यक त्या अधिकृत (Authentic) संदर्भ म्हणून पुस्तकाचा / माहितीचा उल्लेख देखील प्रश्नपत्रावर नमूद करावा. तसेच प्रत्येक प्रश्नपत्रासोबत (Item Sheet) नमूद केलेल्या संदर्भाची छायांकित प्रत जोडणे बंधनकारक आहे. सहपत्र- (२) सोबत पांढरे जाड कोरे शीटही पुरविण्यात येत आहेत. त्याचा वापर भविष्यात प्रश्नपुस्तिका तयार करण्यासाठी करावयाचा असल्याने छापील प्रश्नपत्रिका (Item sheet) प्रश्न पर्यायासहीत जसेच्या तसे पुन्हा त्याच प्रश्नक्रमांकानुसार पांढ-या को-या शीटवरही (प्रत्येक एकच प्रश्न याप्रमाणे) लिहिण्यात यावेत. या शीटवर अचूक उत्तर लिहू नये याची कृपया नोंद घ्यावी. प्रश्नपत्र (Item Sheet) व पांढ-या को-या पानावर कशा पध्दतीने लिखाण करावयाचे आहे, याबाबत नमूना (Specimen) सोबत (सहपत्र-५) जोडला आहे.

७. शासनाने स्पर्धा परीक्षांमधील अनुचित मार्गास प्रतिबंध करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी अधिसूचित केलेला "महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम, २०२४" हा कायदा आयोगाच्या परीक्षांना देखील लागू केल्यामुळे प्रश्न तयार करण्याचे काम आयोगाने आपल्यावर सोपविले आहे, ही बाब आपण कृपया गोपनीय ठेवणे अपेक्षित व बंधनकारक असणार आहे. आपण प्रश्न तयार करीत आहात याची माहिती प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या इतरांना होणार नाही, याची दक्षता घ्यावी. हे पत्र आपणांस व्यक्तीगत असल्याने प्रस्तुत काम आपण आपल्या दैनंदिन कार्यालयीन कामाचा भाग समजू नये. आयोग प्रश्नलेखकांची नावे गुप्त ठेवीत असल्यामुळे आपण सुध्दा कृपया या कामासाठी अन्य व्यक्तीची मदत घेऊ नये. तसेच प्रस्तुत आशयाची माहिती कुटुंब / नातेवाईक / सहकारी / मित्र- परिवार वा अन्य व्यक्ती यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या कधीही, कोणत्याही स्वरुपात देणार नाही असे प्रश्न तयार करुन झाल्यांनतर प्रमाणित देखील करावे लागणार आहे.

८. आपण तयार केलेले सर्व प्रश्नपत्र (Item Sheet) व पांढ-या शीट, प्रमाणपत्र अ, ब आणि क (सहपत्र-३) प्रमाणित करुन तसेच शिल्लक राहिलेल्या सर्व कागदपत्रांसह लिफाफा बंद करुन **दिनांक** 01 नोव्हेंबर, 2024. पर्यन्त किंवा त्यापूर्वी **आयोगाच्या कार्यालयात सोबत जोडलेल्या लिफाफ्यामध्ये योग्यरित्या बंद करुन फक्त रजिस्टर / स्पीड / कुरीयरद्वारे विनाविलंब पाठविण्यात यावे.**

९. प्राश्निकांना वेळोवेळी सूचना देऊनही प्रश्नाबाबतचे संदर्भ प्रश्नपत्रासोबत जोडत नाहीत, असे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. प्रश्नउत्तरासंदर्भात उमदेवारांची येणारी अभिवेदने व त्यावरील तज्ज्ञांच्या अभिप्रायाच्या अनुषंगाने प्रश्नांची उत्तरे पडताळून पाहणे आयोगास शक्य होत नाही. ऐनवेळी संदर्भ शोधणे / मिळविणे या कामी कालापव्यय होत आहे. परिणामी, निकाल प्रक्रियेस विलंब होत आहे, याची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. यापुढे प्रत्येक प्रश्नाकरिता नमूद केलेल्या संदर्भाच्या छायांकित प्रती प्रश्नांसोबत (Item sheet) जोडलेल्या नसतील / काढण्यात येणारे प्रश्न विषय घटकांशी संबंधित नसतील / प्रश्नपत्रात सर्व माहिती भरली नसेल तर सदर प्रश्नपत्र आयोगाकडून स्वीकारले जाणार नाही व त्याचे मानधनही देण्यात येणार नाही, याची दखल कृपया गांभीर्याने घ्यावी.

१०. प्रत्येक प्रश्न दोन्ही भाषेत (मराठी व इंग्रजी) तयार करण्यासाठी आपणांस रुपये **२५०/-** (अक्षरी रुपये दोनशे पन्नास फक्त) या दराने मानधन देण्यात येईल. यासंबंधीच्या मानधन प्रमाणपत्रावर (सहपत्र-४) नमुद केलेल्या जागी आपण स्वाक्षरी तसेच आपल्या बँक खात्यासंबंधी माहिती नमूद करुन स्वतंत्र लिफाफा त्वरित सादर करावा. **मानधनाची रक्कम NEFT द्वारे आपल्या खात्यात जमा करण्यात येईल.**

११. काही अपरिहार्य कारणांमुळे आपणांस प्रस्तुत काम करणे शक्य नसेल, अशा प्रसंगी या पत्रासोबत पाठविण्यात आलेली सर्व कागदपत्रे आयोगाच्या दृष्टीने महत्त्वाची व गोपनीय असल्याने मोठया लिफाफ्यामध्ये घालून माझ्याकडे रजिस्टर्ड पोस्ट पार्सलनेच परत पाठवून द्यावीत.

१२. या संदर्भातील सर्व पत्रव्यवहार कृपया माझ्याच नावे करावा.

**आपला विश्वासू,**

**(सु. ह. उमराणीकर)**
**प. नि. व स. स.**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**सहपत्रे :** (१) संबंधित अभ्यासक्रम.
(२) हिरवे छापील प्रश्नपत्र (Item Sheet) व पांढरे जाड कोरे शीट (मूळ प्रश्न लिहिण्यासाठी).
(३) प्रश्न स्वत: तयार केल्याचे प्रमाणपत्र अ, ब आणि क.
(४) मानधन प्रमाणपत्र.
(५) प्रश्नपत्र व पांढरे कोरे शीटवर कशा पध्दतीने लिखाण करावयाचे नमुने (Specimen)
(६) प्रश्न कश्या प्रकारचे असावेत याबाबत नमुना प्रश्नावली.
(७) विशेष सूचना.
(८) दि. ०४ मे, २०२३ रोजीचे शासन परिपत्रक